Service above Self

# PRIDE EXPRESS

December 2023 | Year - 14 | Volume - 07

Rotary District 3131

Rotary club of pune pride

Club No: 83661

CREATE HOPE in the WORLD

| President | Secretary | Editor | Director Club Admin |
|---|---|---|---|
| Rtn. Sudhir Bapat | Rtn. Vaishali Deo | Rtn. Vinay Jumde | Rtn. Radha Gokhale |


## 'Straight from the heart': from the desk of President



Friends,

As I write this, we are just a few days from the AGM, which means that 6 months of the year have gone by and it's a good time to take stock of where we are in RY 2023-24

Some of the highlights of the year to date…

- We crossed membership strength of 50. The result of efforts by recent PPs and Membership Directors. Congratulations to all of us !!

- We have raised / received firm commitment of Rs 25 lakhs from CSR partners, sponsors and donors

- The funds are being deployed across projects – Gift Of Life, NAWNI, Happy Anganwadi, Project Hope and more

- We are organising fundraiser Sukoon to help build our corpus to execute more projects in 2nd half and continuing into RY 24-25

Going forward, even as we continue the momentum of service and vocational projects, we should also reflect on our club's recent track record on contribution to The Rotary Foundation (TRF). In the current year, as against the goal of US$ 8800 to TRF, we are at less than 30% achievement at the half way mark. I will again appeal to all members to donate to APF which will enable us to do bigger projects in future.

Regarding weekly meetings, there is feedback that we should meet more often at our regular venue and the programs should have more participation. Our program committee has taken note and we will try to improve in this direction during the second half. In this issue we have published the meeting calendar for the next quarter Jan-Mar 2024.

I will end by extending my best wishes to PE Radha and the newly formed Board for RY 24-25. It is heartening to see new members quickly taking up positions of responsibility and RCPP will certainly benefit from the energy and new ideas they bring.

Let's have a great New Year 2024 !!

Yours in service

**Rtn. Sudhir Bapat**

**President (2023-24)**

## I love Rotary...



Vaishali Deo

**मला आवडलेली रोटरी:**

**माझा Ann to Rotarian सुंदर प्रवास**

अतुलच वर्ष म्हणजे बरोबर दहा अकरा वर्षांपूर्वी आम्ही रोटरी जॉईन केली.

सगळ्यांनाच माहिती आहे की आपण रोटरी कशा पद्धतीने जॉईन होतो by invitation. सुनीलचा मित्र श्रीराम उपाध्ये यांनी एक दिवस सुनीलला विचारलं, अरे तुला रोटरी जॉईन करायला आवडेल का? आम्हाला तसं रोटरी बद्दल काहीच माहित नव्हत. नवीन मेंबर्स जॉईन होण्यासाठी एक प्रोग्रॅम आयोजित केला होता. उत्तम वक्ते बोलावले होते. त्यांनीं रोटरी क्लब म्हणजे काय इत्यादी माहिती सांगितली. बऱ्याच जणांचे अनुभव ऐकले. रोटरी ची माहिती नसल्याने मी काही गेले नव्हते. त्या नंतरच्या weekend la club ची मॉन्सून पिकनिक होती. सगळयांनी सुनीलला खुप आग्रह केला की तुम्ही या. पण एकदम वेगळ्या लोकांबरोबर मला जावेसे वाटले नाही. मी काही गेले नाही तिकडे म्हटलं काय रोटरी वगैरे उगीच काहीतरी नवीन आणि मुलं पण आपली नववी दहावीत कुठे मध्ये ह्या गोष्टींमध्ये आपण जायचं असं माझे मत. काय कोण जाणे तर सुनील ला हे छान वाटले होते. पुढच्या मीटिंग ला मी गेले. म्हटलं बघुया तरी काय आहे ही रोटरी!!! त्यावेळेला श्रावण महिना होता बहुतेक. मेहंदी स्पर्धा आणि अंताक्षरी असे काही प्रोग्रॅम होते नंतरच्या मीटिंग मध्ये. सगळे जण आपण होऊन येऊन बोलले. ओळख करुन घेतली. हातावर मेहंदी काढली. जोरदार अंताक्षरी चा प्रोग्रॅम झाला. पुढची मीटिंग गणित ओलंपियाड. वर्गात जायचे मुलांना पेपर द्यायचं मग त्याच्यावर पर्यवेक्षक म्हणून सही करायची आणि एक लहानपणा पासून ची इच्छा आपण स्वतः बाई म्हणून पर्यवेक्षक म्हणून सही करायची, मुलांनी अडचण आली, प्रश्न विचारले की त्याची उत्तरे त्यांना देण्याचा प्रयत्न करायचा हे सगळं एक वेगळंच वाटलं. म्हणलं म्हणजे

रोटरी ही सामाजिक कार्यात सहभागी व्हायला एक उत्तम पर्याय आहे तसाच पुन्हा एकदा लहानपणी आवडत असलेल्या, राहून गेलेल्या गोष्टी पुन्हा अनुभवायचा प्लॅटफर्म आहे. सईने विचारले की मग काय आवडली का रोटरी येणार का तुम्ही आणि आम्ही त्या दिवशी तिथेच चेक दिला. तर मग अशा पद्धतीने आमचा रोटरीमध्ये प्रवेश झाला. थोडक्यात आपण जे लहानपण परत जगणे म्हणतो ना ते जगण्याचे माझे दिवस चालू झाले. आयुष्यामध्ये पहिल्यांदा स्टेजवर गाणं गायलं ,भरत नाट्याला नाटकामध्ये उभे राहिलो, कविता करण्याचा प्रयत्न केला, मेहंदी काढली, गरबा, रांगोळी काढली, मग मागे वळून बघण्याची वेळच आली नाही. सुरुवातीच्या काही काळामध्ये मला विचारलं की अगं तू कल्चरल कमिटी चेअर पर्सन होशील का ? ते तर मला काही कळायचं नाही की म्हणजे काय! तर मी म्हटलं की मला तुम्ही पहिल्यांदा तुमच्याबरोबर काम करायची संधी द्या आणि मला कळेल .किती वेळा त्याच्यानंतर कल्चरल कमिटीची मी चेअर पर्सन झाले.

अस करता करता सुनील त्याच्या व्यापामध्ये बिझी होत गेला आणि मग त्याने मला सांगितलं की माझ्यापेक्षा तू चांगली रोटेरियन होशील आणि दिनेशच्या वर्षांमध्ये मी रोटेरियन झाले. आता इथपासून माझ्या रोटरीच्या प्रवासाला सुरुवात झाली. दिनेश चे वर्ष संपता संपता करोना लाट आली. संजोताच्या वर्षात ऑनलाइन रोटरी झाली. पूर्ण ऑनलाईन असल्यामुळे एक वेगळं हटके वर्ष साजरे केले. त्याच्यानंतरच्या अश्विनीच्या वर्षापासून डायरेक्टर बोर्ड जॉईन केलं आणि रोटरी मध्ये पुढचं पाऊल पडलं. त्यावर्षी मी मेंबरशिप डिरेक्टर झाले संजोताच्या वर्षामध्ये करोनाच्या अडथळ्यामुळे आपल्या क्लब मध्ये दहा-बारा माणसांनी क्लब सोडला आणि एकदम छोटूसा क्लब आणि मेंबरशिपची वाढविण्याची धुरा खांद्यावर पडल्यावर थोडे टेन्शन आले. पण अश्विनीने दिलेला पूर्ण पाठिंबा आणि तिने केलेली मदत आणि क्लबचं सहकार्य, त्या वर्षापासून आपण मेंबरशिपच्या वृद्धिमध्ये मागे पाहिलंच नाही. माझ्या वेळेपासून सहा मेंबर्स नंतर आठ मेंबर आता बारा मेंबर,असं करत आपल्या क्लबची घोडदौड चालू आहे ती अशीच चालू राहो ही माझ्यातर्फे सदिच्छा. पुढच्या वर्षी मी न्यू जनरेशन म्हणजे युथ अवेन्यू डायरेक्टर झाले. दोन इंटरॅक्ट शाळा भरपुर प्रोग्रॅम केले विद्यार्थ्यांसाठी, रोटरॅक्ट पुनरुजीवन झालं आणि आता अतिशय सुंदर पद्धतीने रोटरॅक्ट क्लब चालू आहे. विद्यार्थी सहाय्यक समितीमध्ये एक उत्तम प्रकारचा मेडिकल रायला आपण करू शकलो या सगळ्या गोष्टींमध्ये मला प्रेसिडेंट उज्वलची खूपच मदत झाली त्यामुळे एक एवढ्या मोठ्या डिरेक्टरशिपची जबाबदारी घेताना मला तसं टेन्शन कधी आले नाही. सुधीर म्हणाला की त्याच्या प्रेसिडेन्सी वर्षामध्ये सेक्रेटरी होशील का? सेक्रेटरीपदाला कॉम्प्युटरची एवढी काम आणि माझा आणि कॉम्प्युटरचा 36 चा आकडा, मला कंप्यूटर चे काम येत नाही तर मी कशी काय या सगळ्या गोष्टींची जबाबदारी पार पाडू शकेन? तर त्याने मला दिलासा दिला की मला जुने मेंबर्स आणि नवीन लोकांमध्ये छान दुवा बांधता येईल असे वाटते त्यामूळे सेक्रेटरी म्हणून काम करून सगळा क्लब बांधून ठेवेल अशा पद्धतीची व्यक्ती सेक्रेटरी या पोझिशन ला हवी आहे आणि मला जी काय गरज पडेल कम्प्युटर संदर्भात तिथे मला लागेल ती मदत मला मिळू शकेल. मग यावर्षी मी एवढी मोठी जबाबदारी खांद्यावर घेतली. हे वर्ष सुद्धा आतापर्यंतचा तरी उत्तम पार पडले आहे त्याबद्दल मला खूपच आनंद वाटतो. मग आली नॉमिनेशन कमिटी यावर्षीची आणि कमिटीतील सर्वांनी मला गळ घातली की तू 26 27 या वर्षाची प्रेसिडेंट हो.

मी होकार तर दिलाय पण मला खूप भीती वाटते की हे एवढ मोठ लीडरशिपचं काम मला जमेल का? मला रोटरी तर भावली, रोटरीमध्ये काम तर मी करते आहे. तुम्हा सर्वांच्याच मदतीने हे एवढं मोठे शिवधनुष्य पेलण्याचा प्रयत्न करेन. सगळ्यांची साथ आणि आशीर्वाद असेच माझ्या पाठीशी असू देत आणि आपण नेहमीप्रमाणेच आपल्या सेवन स्टार क्लब आहे तो पुढे नेऊ या

## Watch on OTT



**Vaishali Munot**

**"The Railway Men" 2023:**

**एक संक्षिप्त परीक्षण**

नमस्कार मित्रांनो व मैत्रिणींनो!

चला, "The Railway Men" 2023 बद्दल बोलूया। ही एक नवीन वेब सिरीज आहे जी आपल्याला 1984 मधील भोपाळ गॅस दुर्घटनेची कथा सांगते। ही दुर्घटना खूप भीषण होती, ज्यात हजारो लोकांचे प्राण गेले आणि हे जगातील सर्वात मोठ्या औद्योगिक दुर्घटनांपैकी एक आहे।

"द रेलवे मेन" मध्ये दाखवले गेले आहे की, या दुर्घटनेनंतर रेल्वे कर्मचारी आणि सामान्य लोक कसे धैर्य आणि साहसाने त्याचा सामना करतात। ही कथा तुम्हाला भावुक करेल आणि प्रेरणा देखील देईल।

तर, जर तुम्हाला ही ऐतिहासिक घटना आणि त्या काळातील लोकांच्या कथांची जाण आणि अनुभव घ्यायचा असेल, तर "The Railway Men" ही तुमच्यासाठी परिपूर्ण वेब सिरीज आहे। ही मालिका तुम्हाला इतिहासाच्या गहिऱ्यात घेऊन जाईल आणि त्या काळातील सत्य आणि संघर्ष दाखवेल।

आशा आहे की तुम्हाला ही सिरीज आवडेल.

## बालपणीच्या हिंदोळ्यावर



**Sarita Bapat**

I was born in Pune but have lived all my life before marriage in Delhi. In my childhood, I remember staying in the Lodhi colony government quarters.

Life was interesting. We had a south Indian family on 1 side and Mathurs (whom I am still in con-

tact with) on the other. I learnt mutton eating at their place as we used to go as 'kumarika', got our feet washed, were given chane puri and halwa and then a lunch of mutton !

Holi was a huge festival where gujiyas(khoya karanjis) were sent by our neighbours. We used to start getting hit by water balloons atleast a week before Holi and really had to be careful coming back from school.

Travelling in DTC buses, taught my sister and I how to save ourselves from eve teasers and 6 chya aat gharat was my father's rule.

My father used to take us on a drive on Diwali especially, to see the Rashtrapati bhavan, North and South block and the Parliament which used to be decorated with lights. Durga puja was celebrated with a lot of fervour as we had Dushera holidays.

My mother learnt a lot of north indian cooking, which all of us still relish. Going to the dhaba, Nirula's used to be bi annual treats

Delhi is hot in summer and cold in winter. Our wardrobes changed completely including the school uniform which consisted of a woollen skirt, blazer and woollen socks. My mother had shawls and sweaters in all shades as marriages happened during the winters

Everyone from Mumbai or Pune who wanted to go to Kulu Manali, Mussoorie came to our house and then went ahead. They came with flimsy sweaters as had no idea about how cold it can be. My parents gave them their coats. Most came for their honeymoons but couldn't stand the cold and came and stayed with us. We had so many guests as a result and it was us siblings' responsibility to show them around Delhi.

I enjoyed my childhood and a part of my youth in Delhi. I still say'Meri Dilli meri shaan' and abhi bhi dil se main dilliwali hoon!

## पत्रास कारण कि



**Neeta Kelkar**

**ती. आई यांस,**

स.न.वि.वि.

पत्र लिहायचे कारण म्हणजे आज तुमची खूप आठवण येत आहे कारण मुलींना आज नऊवारी नेसवून शाळेत पाठवायचे होते हो...

..आणि तुम्ही एकदम एक्स्पर्ट.

आणि मुख्य म्हणजे 12 dec ला तुमच्या लग्नाला 60 वर्ष पूर्ण होत होती. हौशीनी आपण साजरा केला असता नै?. म्हणूनच खरे तर तुम्हाला पत्र लिहायला घेतले. तुमच्या दोघांची आठवण नेहेमीच येते.

आज जेंव्हा तुमच्या पणत्या
घरी नाचतात, खेळतात, दंगा करतात तेंव्हा जास्त जाणवतं. .तुम्ही दोघांनी तो आनंद नक्कीच उपभोगला असता.

त्यांना किती तरी गाणी, नाच, श्लोक शिकवले असते..आजोबांनी चित्रकला शिकवली असती, मराठी जुन्या
कविता शिकवल्या असत्या... आज तुमच्या दोन्हीं नात सुना तुमच्याच सारख्या कलाकार आहेत.. एक गाण्यात, तर दुसरी नृत्यात ..तुम्हाला नक्की अभिमान वाटला असता आणि कौतुकही...

कित्ती मजा केली असती आपण सगळ्यांनी मिळून...

खरे तर किती तरी वेळा तुमच्या शिस्तीचा, नीटनेटके पणाचा आणि मुख्य म्हणजे वेळ पाळणे ( हे तर तुमचं ब्रीदवाक्य होत) ह्या शब्दाचा खूप राग यायचा ..पण आज आता मी तुमच्या पोझिशन ला आली आहे तेंव्हा ह्या सगळ्या गोष्टींचे महत्व समजत आहे

कित्ती कित्ती गोष्टी तुमच्या कडून शिकण्या सारख्या होत्या .. ..

त्या काळात ही तुमचे खूप आधुनिक विचार होते.. तुम्ही स्वयंपाकघर पहिल्याच दिवशी माझ्या ताब्यात दिले आणि शेवट पर्यंत एकही दिवस लुडबुड नाही. (आज समजत आहे सोडणे सोपे नाही)

मी उत्तरप्रदेशहून महाराष्ट्रात आले वय फक्त 20 होते पण तुम्ही नेहेमी सगळ्या गोष्टी समजावून सांगितल्या . कितीतरी वेळा पाठीशी घातलेत... मला tuition घ्यायला सांगितल्या, BEd करायला लावलं...कित्ती कित्ती उपकार आहेत माझ्यावर तुमचे

मला स्कूटर शिकवली.. आज त्याचे महत्व आणि उपयोग समजतोय..

गोड बोलून समोरच्याला न दुखवता कसे बोलावे हा गुण अगदी तुमच्या कडून घेण्यासारखाआहे..

आज पत्र लिहायला घेतले म्हणजे कित्येक गोष्टी तुमच्याशी बोलायच्या राहून गेल्या.. समोरच्या वर प्रेमळ धाक कसा असावा ही तुमची खासियत..आणि कदाचित म्हणूनच मनात असून ही तुमच्याशी बोलू शकले नाही....



आज तुमचे महत्व जाणवत आहे .. शेवटी शेवटी तुमच्या तोंडी फक्त नीता ,... नीता.. हाका असायच्या ..त्या वेळी चीड चीड व्हायची काय सारखं हाका मारतात ..पण आज समजत आहे की त्या हाकांमध्ये आपलेपणा होता ..कुठे तरी माझ्या बद्दल विश्वास होता...

..आज घरी तुम्ही दोघ नाही... खूप उणीव भासत आहे... तुम्ही दोघं जिथे असाल नक्की गोकुळ बघत असाल.. तुमचे आशीर्वाद , तुमची शिकवणआमच्या पाठीशी सदैव असुदेत.

**तुमचीच, - नीता**

## Annets' World



Shamika Jogalekar

### हे जीवन सुंदर आणि आनंदी आहे

नमस्कार, हे जीवन सुंदर आणि आनंदी आहे या लेखाच्या तिसऱ्या भागात मी आज आपल्या सर्वांच्या आवडीच्या विषयावर लिहिणार आहे; आणि तो विषय म्हणजे पैसे, Money, धन... आहे कि नाही इंटरेस्टिंग विषय?

नुकतीच दिवाळीची धामधूम संपली आहे. सगळ्यांची भेटवस्तूंची देवाण घेवाण, खरेदी झालीच असेल. माझी मैत्रीण चेष्टेत म्हणाली, दिवाळी आपलं दिवाळं काढते, किती तो खर्च...बोनस, गिफ्ट्स, नवीन कपडे, दागिने, खरेदी बापरे पैसे संपूनच जातात अगदी.... ती मजेत म्हणत होती पण मी तिला तिथेच रोखलं, तिला सांगितलं कि चेष्टेत पण असं कधी म्हणू नकोस.

दिवाळी हा आपला सगळ्यात मोठा सण, पूर्ण भारतभर अतिशय उत्साहाने साजरा केला जाणारा असा हा सण. सगळेच जण आपापल्या परीने हा सण आनंदात साजरा करतात. दिवाळीला आपण सर्वजण अतिशय भक्तिभावाने लक्ष्मीपूजन साजरे करतो. लक्ष्मी ही धनाची, संपन्नतेची देवता मनाली जाते, आणि तिचे पूजन आपण धनप्राप्ती साठीच करत असतो, मग कशी काय ती आपला दिवाळं काढेल? यातला मजेचा भाग वेगळा पण आपण सर्वांनीच अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे कि नकळत आपण काय मागत असतो.

माझ्या Prosperity Workshop मध्ये मी कायम सांगते कि, Prosperity Consciousness develop करा Poverty Consciousness नको...आता तुम्ही म्हणाल हे काय नवीन... कोण कशाला Poverty Consciousness develop करेल...पण विश्वास ठेवा आपल्या नकळत आपण हेच करत असतो, आणि मग ७५% लोकांना money problems असतात.

बऱ्याच लोकांना, माझ्यासाठी पैसे दुय्यम आहेत किंवा मी आयुष्यात पैशाला महत्व देत नाही, मी पैशासाठी काम करत नाही वगैरे वगैरे असे म्हणायची सवय असते. असे म्हणण्यात काहीच चूक नाही, ते काम करण्या मध्ये मिळणारा आनंद श्रेष्ठ असूच शकतो. पण कितीही कटू असलं तरी सगळ्या गोष्टींसाठी शेवटी पैसेच आवश्यक असतात. आपण समाजकार्य करतो पण त्या साठीही शेवटी निधीच उभा करावा लागतो. त्या मुळे पैशाला महत्व द्यावेच लागते. आणि पहिल्या भागात मी सांगितले त्या प्रमाणे आपण जो विचार करतो, बोलतो तेच attract करतो. आपण खरेदी करायला जातो, तिथे पहिल्यांदा price -tag बघतो आणि मग म्हणतो नको हे खूपच महाग आहे किंवा नकोच, आपल्याला नाही परवडणार, आत्ता नको आत्ता थोडे budget tight आहे. काहीही करताना मग ती खरेदी असो, कुठे फिरायला जायचे असो किंवा काहीही करायचे असो पहिल्यांदा विचार येतो तो पैशाचाच...मग पैसे महत्वाचे नाहीत? आणि नकळत आपण Poverty consciousness develop करत जातो. तुम्ही म्हणाल ही तर बेसिक गोष्ट आहे. पण हीच सगळी वाक्य किंवा विचार आपण थोड्या वेगळ्या पद्धतीने करू शकतो... जसे, पैसे आणि कामातला आनंद दोन्ही माझ्यासाठी महत्वाचे आहेत. Price tag बघितल्यावर, बापरे किती महाग असा विचार न करता असं म्हणा कि थोड्याच दिवसात ही गोष्ट मला आरामात घेता येणार आहे.

अजून एक टीप, कुठेही पैसे देताना असा विचार मनात आणा कि हे पैसे माझ्याकडे double होऊन परत येत आहेत. थोडेसे विचार बदलून बघा कसा फरक पडतो ते. विचारात खूप सामर्थ्य आहे बरं, विचारांना चांगल्याची सवय लावा जे हवे आहे ते प्राप्त करू शकाल.

आता छोट्या छोट्या Prosperity टिप्स. - रोज संध्याकाळी दिवा लावल्या वर गुलाबपाणी किंवा गुलाबाच्या अत्तराचा स्प्रे मुख्य दरवाजाच्या बाहेर आणि घरात करा, गुलाब लक्ष्मीला अतिशय प्रिय आहे. आपल्या काही मंत्रांमध्येही लक्ष्मी प्राप्तीचे खूप सामर्थ्य आहे. त्याचे नित्यनेमाने पठाण उपयुक्त ठरू शकते.

Pyrite, Citrine, Green Aventurine या सारखे crystals सुद्धा money attract करण्यासाठी

वापरले जातात.

आपल्या घरगुती मसाल्याच्या पदार्थात सुद्धा किती ताकद असते, दालचिनीची जुडी लाल दोऱ्याने बांधून तिजोरीत किंवा तुम्ही जिथे पैसे ठेवता तिथे ठेवा money enhancement साठी उत्तम.

११ गोमतीचक्र लाल कापडात बांधून तिजोरीत ठेवा, असे किती तरी साधे आणि सोपे उपाय लक्ष्मीप्राप्तीसाठी आपण करू शकतो.

अन्नदान, गरजूंना मदत, सामाजिक कामांसाठी यथाशक्ती आर्थिक मदत याही गोष्टी आपण करू शकतो.

कोणाकोणाचा विश्वास नसतो काही गोष्टींवर, पण या उपायांमुळे कोणाला अपाय तर होत नाही, मग करून बघायला काय हरकत आहे?

अजून एक महत्वाची गोष्ट money ही पण एक Energy आहे आणि Energy ही नेहमी flow होणे गरजेचे आहे त्यामुळे योग्य प्रमाणात ही energy वाहती राहिली तर त्याचा ओघ उत्तम राहतो.

शेवटी मी असे सांगेन कि पैसे हे नक्कीच महत्वाचे आहेत, त्याला योग्य तो सन्मान द्या, पैसे नेहमी यथायोग्य खेळते ठेवा, पैसे कमावण्यात साठवण्यात आणि खर्च करण्यात समतोल ठेवा, त्याचा आनंद घ्या.

अशा प्रकारे उत्तम आरोग्य, उत्तम नातेसंबंध आणि उत्तम आर्थिक उन्नति आपले जीवन आनंदी आणि सुंदर करण्यासाठी खूप महत्वाचे ठरतात.

धन्यवाद.


अधिक माहिती आणि विविध कार्यशाळांच्या माहिती साठी संपर्क:

**शमिका जोगळेकर खाड्ये - ९२२३४४१८१३**


## Achievements



**Rajas Bhave** won silver in Singles and bronze in doubles in Table Tennis. second overall. Abhinav School stood second overall.

## Sports Round up



**Anil Kasodekar**

### *The Rise and Fall of Hockey in India*

### Origin of Hockey

Hockey, as we know it, came into existence rather recently. However, there is evidence that dates as far back as 2000 BC! They are carvings that depict games being played with sticks and a ball like object. Ancient Egyptian carvings shows the earliest and simplest version of the sport where teams used curved sticks to hit ball.



The game has now evolved into field-hockey, ice-hockey, rink-hockey, roller-hockey and floor-hockey, all developed and with its own rules and regulations, played in different parts of the world.

**The Advent of Hockey in India**

Just like cricket, hockey was yet another sport that was brought to us by British rulers between the 17th & 18th century. The sport was introduced as a popular school game.

With developed rules, the game made its way to everywhere in the world that was under the control of the British Empire as a leisure sport for the officers. In the 1850s, the British Army introduced the sport to India.

Owing to the availability of large fields and minimal equipment, it became the go-to sport for children and young adults in the country. 1855 saw the opening of the first Hockey club in India, in Kolkata. Ever since, tournaments were held in both Kolkata and Mumbai, bringing more popularity to the game. While discussions of forming a hockey association were held in 1907 and 1908. However, the fruition of the plan only came in 1925 with the birth of the Indian Hockey Federation (IHF).

**Olympic Legacy**

In 1926, the Indian hockey team played their first international game in New Zealand, where they won 18 out 21 games. With players like Dhyan Chand, there was no doubt that India were giants in Hockey right from the start.

The sport become a permanent addition to the Olympics in 1928. Winning a gold medal in their very first Olympics was only the beginning of what would blow the minds of all hockey players and enthusiast across the world for years to come.



The team had 6 consecutive wins ever since, winning gold at all the Olympics until 1956 in Melbourne. The opposite teams had no chance of winning as Indian had a massive score difference every time, many a times defeating their opponents with not even a single goal to their name.

Pakistan's victory over India in the 1960 Olympics in Rome denoted the first Olympic victory of the former and the first loss of the latter. Though India reclaimed the gold title in 1966 Asian Games (after two silvers in the same), it was evident that team was not as strong as before.

With the gaining popularity of Cricket and lower support for Hockey, the national sport became almost forgotten in the country. While the sport has seen strong players and commendable victories over the years, the spirit that the game once had among Indians has largely been unfounded.

The last world cup win for India was in 1975. This was followed by several victories in the Asian Games and Asian Cup. However, the team still holds 83 wins out of 134 matches played. The Indian team still remains to be the most successful team in Olympic history.

## कवितापूर्ती



खालील कवितेमधील शेवटची (चौथी) ओळ तुम्ही तुमच्या मनाने लिहून **कवितापूर्ती** करायची आहे.

(सर्व उत्तरे आरती परचुरे कडे पाठवायची आहेत.)

सर्वांनी पाठविलेली उत्तरे पुढच्या अंकात छापण्यात येतील.

- **ॲन आरती परचुरे**

पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर
झाडांनी किती मुकुट घातले डोकीस सोनेरी
----------------------

भा.रा.तांबे



### ***मागील महिन्यातील कविता....***

*अजून नाही जागी राधा*
*अजून नाही जागे गोकुळ ,*
*अशा अवेळी पैलतीरावर*
*आज घुमे का पावा मंजुळ*

*- इंदिरा संत*



**मागील महिन्यातील कवितेला आलेल्या प्रतिक्रिया......**

कृष्ण वाजवी पावा मंजुळ
**- सुनेत्रा मंकणी**

प्राजक्ताचा येई दरवळ
**-अतुल परचुरे**

पावा वाजवी तो मुरलीधर
**-राधा गोखले**

राधेसाठी कृष्णही व्याकूळ
**-आरती परचुरे**

## Month at a glance.. (December 2023)

### "नन्हा सा दिल"..

This is an update on our prestigious District initiative project **Gift of Life - *Nanha Sa Dil* Pediatric Cardiac Surgery for Congenital Heart Disease (CHD) within EWS community.**

This is a collaborative effort spearheaded by RC Pune Pride in association with Persistent Systems and DMH. Persistent has supported with **15 lacs** through their CSR. This initiative is a testament to the power of partnerships and community driven healthcare, with a focus on providing life-saving medical treatment to the children in need.

Last week we have successfully executed **tripartite agreement** with all stakeholders. The project has already achieved significant milestone, with **two** patients successful received life-saving treatments and two more patients are currently in pipeline.

The overarching goal of this project is to extend its reach and impact by supporting a total of **6 to 8 patients**. To achieve this ambitious target. The community team is making an **earnest appeal** to all club members to actively participate in the initiative by helping identify potential beneficiaries within their personal network. This target has to be completed on or before **March 15, 2023**





**प्रतिक्रिया...**

माझा मुलगा चिरंजीव पद्माकर (आरुष) मिलिंद कुलकर्णी याच्या हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी आपण केलेल्या मदतीबद्दल मी आपल्या रोटरी क्लब ऑफ पुणे प्राइड चा शतशः आभारी आहे.

मी याच्या शस्त्रक्रियेसाठी ठिक-ठिकाणी प्रयत्न केले होते, परंतु वेगवेगळ्या अडचणीमुळे मी तिकडे शस्त्रक्रिया करू शकलो नाही माझ्या मुलाचे ऑपरेशन थोडेसे क्रिटिकल असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. माझ्या आज लक्षात येत आहे की एवढे क्रिटिकल ऑपरेशन सुद्धा जे यशस्वी झालेले आहे ते निश्चितपणे रोटरी क्लब पुणे प्राइडच्या सर्व सदस्यांच्या आशीर्वादातूनच. त्याबद्दल मी क्लबच्या सर्व सदस्यांचे शतशः आभार मानतो.

**- मिलिंद कुलकर्णी (उस्मानाबाद) धाराशिव.**

## Month at a glance.. (December 2023)

## दिवाळी फराळ वाटप






बुधवार दिनांक २९.११.२३ रोजी सकाळी १०.०० वाजता आपल्या क्लबतर्फे सहकारनगर व पर्वती भागातील स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी '*दिवाळी फराळ वाटप*' हा कार्यक्रम पार पडला.

## Industrial Visit - Govardhan Dairy









## RYLA-1







## RYLA-2







## Financial Literacy Workshop















RC Pune Pride held a session for our Interact club on Saturday-25th November,23 at BVKP and BVB Paranjape School. **Rtn.Shailesh Sirsikar**, conducted the workshop on very important and informative topic, **Financial Literacy**. This workshop helped them to gain financial awareness which was very essential in their day to day life.

The workshop's participants were inquisitive and appreciative of the opportunity of getting this information. President Rtn. Sudhir Bapat with First Lady Ann. Sarita, Youth Director Rtn. Madhura K., Ann Vinita, Ann Varsha and Ann Priti from our Rotary Club of Pune Pride attended this event.

# Art Gallery



Lovely fall Colours



Kremlin, Moscow



Japanese Tea Garden, SF



Leh special green apple



Bright flowers



"Merry Christmas!"



Homemade Waffles



Mesmarising Pongong Lake



Lovely flemingo

- ***Shama & Sandeep Kerulkar***

## Minutes of Board Meeting (December)



Minutes of Meeting of the Board of Directors

held on

**3rd December 2023.**

- AGM will held on 29th Dec 2023.
- Telemedicine closure is in progress.
- All new members should log in into RI and District and mobile app. Jt. Secretary and IT officer will help to new members.
- Club is willing to work for more Anganwadies, District thrust area.
- 2 days RYLA was conducted. Residential RYLA was discussed.
- Membership Director will be conducting a orientation program for new members.
- Foundation director appealed for APF donation.
- NAWNI is progressing. Lectures from eminent speakers for mentees are being organized.

**- Rtn. Vaishali Deo**

**Secretary (2023-24)**

| Date | Day | Venue | Programme |
|---|---|---|---|
| January 7 | Sunday | PYC | SPORTS DAY (Carrom, TT, Chess Tournaments) |
| January 13 | Saturday | KHS | Sukoon Fund Raiser |
| January 20/21 | Sat/Sun | Pandit Farm | District Conference |
| January 28 | Sunday | TBD | Club Day |
| February 2 | Friday | Damle Hall | Know your Rotarian |
| February 10/11 | Sat/Sun | TBD | Bhigwan Bird Watching |
| February 16 | Friday | Damle Hall | AG Visit |
| February 23 | Friday | TBD | Synergy/Shukrangan—Peace & Conflict |
| March 1 | Friday | PYC | DG Visit |
| March 8 | Friday | TBD | Vocational Excellence Awards |
| March 15 | Friday | Damle Hall | Historical—Peshva Shree Shete |
| March 24 | Sunday | TBD | Anns Evening + Bawarchi Day |
| March 29 | Friday | Damle Hall | DRT Session |

## Birthdays and Anniversaries

| Name | Birthday | Anniversary |
|---|---|---|
| Parag and Kavita Mulye | | 2nd Jan |
| Jayashree Magikar | 5th Jan | |
| Sunita Kele | 8th Jan | |
| Annet Ketakee Tapre | 9th Jan | |
| Vaishali Munot | 10th Jan | |
| Manjushree & Shrirang Kulkarni | | 10th Jan |
| Kavita Dhupkar-Mulye | 13th Jan | |
| Annet Soham Yadnik | 15th Jan | |
| Vivek Gore | 15th Jan | |
| Preeti and Vivek Gore | | 18th Jan |
| Harshavardhan Bhave | 19th Jan | |
| Dinesh Munot | 10th Jan | |
| Roopali and Vinayak Desai | | 23rd Jan |
| Vijaya Khirad | 23rd Jan | |
| Umesh Kolhatkar | 24th Jan | |
| Dhanashree Bhave | 26th Jan | |
| Madhusudan Kashelikar | 27th Jan | |
| Vaishali Jumde | 29th Jan | |
| Sunetra & Ravindra Mankani | | 31st Jan |

**HAPPY NEW YEAR!**